रविवार दि.१६ फेब्रुवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१५१ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# दाढीवाल्यांना हलक्यात घेऊ नका:होती दाढी म्हणून उद्ध्वस्त झाली तुमची महाराष्ट्र विरोधी आघाडी,

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा ठाकरेंना इशारा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**रत्नागिरी (वृत्तसंस्था)**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या वतीने राज्यभरात आभार मेळावा आयोजित केला जात आहे. आज हा मेळावा कोकणातील रत्नागिरीत पार पडला. यावेळी एकनाथ शिंदे यांनी कोकणवासियांचे आभार मानले. विधानसभा निवडणुकीत दिलेल्या आशीर्वादामुळे मी तुमच्यासमोर नतमस्तक व्हायला आलो आहे, असे ते म्हणाले. शिवसेनेच्या विजयामध्ये कोकणी माणसाचा मोठा सिंहाचा वाटा आहे. एकही आमदार निवडून येणार नाही असे म्हणणाऱ्यांची बोलती महाराष्ट्राने बंद केली, अशा शब्दांत ठाकरे गटाला टोला लगावला.

आज रत्नागिरी येथे आयोजित आभार मेळाव्यात माजी आमदार सुभाष बने, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष रोहन बने, पराग बने यांनी शनिवारी शिवसेनेत प्रवेश केला. तसेच माजी जिल्हा प्रमुख राजेंद्र महाडिक, जिल्हा प्रमुख विलास चाळके, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा रचना महाडिक यांनीही शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी एकनाथ शिंदे बोलत होते.

एकनाथ शिंदे म्हणाले, संताजी आणि धनाजी जसं मोगलांना दिसायचे. तसे तुम्हाला एकनाथ शिंदे पाण्यात दिसतो. माझ्यावर कितीही आरोप करा, कितीही शिव्या द्या. परंतु या एकनाथ शिंदेच्या मागे माझ्या लाडक्या बहिणी आणि लाडके शेतकरी आहेत. तोपर्यंत मला कसलीही चिंती नाही. मी कोणालाही घाबरत नाही. तुम्ही दोन–अडीच वर्षांपूर्वी पाहिले. या राज्यानेच नाहीतर जगातील ३२ देशाने आमच्या बंडाची नोंद घेतली, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

राजन साळवी देखील अडीच वर्षापूर्वी यायला पाहिजे. आज ते शिवसेनेत आले. खऱ्या अर्थाने कोकणात चांगले कार्यकर्ते शिवसेनेत आले. ज्यांच्या



विचाराला लागली वाळवी तिथे कसा राहिल राजन साळवी. तुम्हाला लोक का सोडून जात आहेत, त्याचे आत्मचिंतन करा. मनगटात ताकद लागते. हे शोले सिनेमातील जेलर सारखे सुरु आहे, अर्धे तिकडे जा, अर्धे इकडे जा आणि उरलेले माझ्या पाठिमागे या.... पाठिमागे पाहिले तर कोणीच नाहीये. कशाला उगाच मोठ्या बाता मारताय, असा टोला एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना लगावला.


कोण एकनाथ शिंदे, कोण रामदास कदम असे म्हणायचे. आम्ही करून दाखवले. आम्हाला हलक्यात घेऊ नका. आम्ही काम करणारे कार्यकर्ते आहोत. दाढीवाल्यांना हलक्यात घेऊ नका. किती शिव्या देणार, किती आरोप करणार. होती दाढी म्हणून उद्ध्वस्त झाली तुमची महाराष्ट्र विरोधी आघाडी आणि सुरू झाली विकासाची आघाडी. कशाला माझ्या नादाला लागता. मी कुणाच्या नादी लागत नाही. मी आरोपाला उत्तर देत नाही. मी कामातून उत्तर देतो, असेही एकनाथ शिंदे म्हणालेत.माझा सत्कार झाला. महादजी शिंदे यांच्या नावाचा पुरस्कार मिळाला. एका मराठी माणसाच्या हस्ते मराठी माणसाचा सत्कार झाला. महाराष्ट्राला अभिमान आहे. एकनाथ शिंदेंवर टीका करा. आरोप करा. शिव्या द्या. पण तुम्ही महादजी शिंदेंचा अपमान करता, साहित्यिकांना दलाल म्हणता, ज्यांनी एकेकाळी तुम्हाला मुख्यमंत्री केले त्यांचाही अपमान करता. काही जनाची नाही तर मनाची तरी ठेवा. माझ्यावर कितीही आरोप करा. कितीही शिव्या द्या. माझ्या मागे लाडक्या बहिणी, लाडके भाऊ आणि लाडके शेतकरी आहेत, तोपर्यंत मला चिंता नाही. मी कुणाला घाबरत नाही असाही टोला शिंदे यांनी लगावला.पदे येतात जातात, सत्ता येते जाते, पदे वर खाली होतात. बाळासाहेब ठाकरे म्हणायचे नाव गेले की, पुन्हा येत नाही. मला राज्यातल्या बहिणींनी दिलेले लाडका भाऊ हे पद, हा मान खूप मोठा आहे. माझ्या रक्तातील थेंब असे पर्यंत महाराष्ट्रासाठी समर्पित भावनेने काम करेल. खोके खोके बोलत असतात. या महाराष्ट्राने तुम्हाला घरी बसवलं. तरीही त्यांना कळत नाही. 'सुंभ जळाला पण पिळ जात नाही' अशी यांची अवस्था आहे, असेही एकनाथ शिंदे यांनी यावेळी टीका करताना म्हटले.

# भगवानगड ट्रस्ट संचलित स्पर्धा परीक्षा केंद्रातील विद्यार्थ्यांची गगनभरारी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्री क्षेत्र भगवानगड । प्रतिनिधी**

पुणे येथील रयत प्रबोधिनी ही स्पर्धा परीक्षेतील विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी मार्गदर्शक ठरणारी एक अग्रगण्य संस्था आहे. ह्या संस्थेच्या वतीने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या प्रामुख्याने गट ब व गट क परीक्षा तसेच अनेक परीक्षांसाठी नियोजनबद्ध पद्धतीने विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली जाते. या संस्थेने ऑगस्ट २०२३ मध्ये शासकीय अधिकारीपदी निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांना निमंत्रित केले होते. या कार्यक्रमात बोलताना श्रीगुरु शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर आपण च.झ.ड.उ. / ण.झ.ड.उ. स्पर्धा परीक्षा केंद्र सुरु करणार असल्याचे जाहीर केले होते. त्यानुसार





भगवानगडावरील स्पर्धा परीक्षा केंद्रातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी शास्त्री बाबांनी रयत प्रबोधिनीवरच सोपवली होती. मागील वर्षी गडावर सुरु झालेल्या स्पर्धा परीक्षा केंद्रातील विद्यार्थ्यांनी अपार मेहनतीच्या जोरावर अनेकांनी अधिकारीपदाला गवसणी घातली आहे. यापैकी सूरज अहिरे (तलाठी व ग्रामसेवक), किरण भास्कर सानप (आरोग्य सेवक व महसूल सहाय्यक), सुभाष रंगनाथ मोहिते (प्राध्यापक, डि.इ.ए.ड. कॉलेज, छत्रपती संभाजीनगर), विजय संजय दहिफळे (दारूबंदी पोलीस), पोपट संतोष जगताप (महसूल सहाय्यक), दीपक रामराव बटूळे (महसूल सहाय्यक), प्रफुल्ल गोदरु डोरले (कर निरीक्षक), रविकिरण अजिनाथ कुटे (महसूल सहाय्यक), दीपक आव्हाड (महसूल सहाय्यक) इत्यादी विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या खात्यात अधिकारीपदी निवड झालेली आहे. या निवडीबद्दल श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी सर्वांचे अभिनंदन केले आहे. आपल्या गडावर कीर्तनकारांसोबतच अधिकारी देखील घडवले जात असल्याने गडाच्या भक्तवर्गात देखील उत्साह व आनंदाचे वातावरण आहे.

# पत्रकार धम्मानंद भेदेकर यांना धम्मसारथी पुरस्कार प्रदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

बिलोली तालुक्यातील मौजे चिटमोगरा येथील सामाजिक चळवळीतील अभ्यासु व्यक्तीमत्व तथा पत्रकार धम्मानंद भेदेकर यांना बेटमोगरा येथिल बु.दत्ता गंगाराम सोनकांबळे यांच्या व्दितीय स्मृती दिनानिमित्त मातोश्री रमाबाई भीमराव आंबेडकर सेवाभावी संस्था बेटमोगरा यांच्या वतीने दिला जाणारा धम्म सारथी हा पुरस्कार पत्रकार धम्मानंद भेदेकर यांना देऊन गौरविण्यात आले.

चिटमोगरा तालुका बिलोली येथील ग्रामीण भागातील एक निर्भीड पत्रकार म्हणून गेल्या एक दशकापासून पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या धम्मानंद भेदेकर यांच्या कार्याची दखल घेऊन बेटमोगरा तालुका मुखेड येथील मातोश्री रमाबाई भीमराव आंबेडकर सेवाभावी संस्थेच्या वतीने दिला जाणारा सन २०२५ चा धम्म सारथी हा पुरस्कार दि.१४ फेब्रुवारी रोजी आयोजित



करण्यात आलेल्या कार्यक्रमात मान्यवर मंडळीच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

या प्रसंगी भंतेजी संघप्रिय राहूननगर नांदेड, केंद्रीय शिक्षक भारतीय बौद्ध महासभेचे नांदेड जिल्हा अध्यक्ष हौसाजी वारघडे , रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष अनिल शिरसे, भारतीय बौद्ध महासभेचे मुखेड तालुका अध्यक्ष तथा पत्रकार गंगाधरजी सोंडारे, डॉ , राहुल कांबळे ,युवा व्याख्याते तथा उपसरपंच सिद्धार्थ कांबळे बेळीकर ,वंचित बहुजन आघाडी मुखेड तालुका संघटक अँड .संजयजी भारदे, अँड सचिन वाघमारे,मातोश्री रमाई भिमराव आंबेडकर सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव यांच्यासह अनेक मान्यवर मंडळी, महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महामानव बोधिसत्व परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर, तथागत भगवान गौतम बुद्ध आणि माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवर मंडळीच्या शुभहस्ते करून या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.तसेच संध्याकाळी ९.०० वाजता भिम शाहिर दिपक कांबळे, संजय भारदे यांचा बुद्ध भिम गणिताचं कार्यक्रम संपन्न झाला.

# गुरुजी फाउंडेशन तर्फे तळेगाव आणि चिंचाळा येथे पाचव्या व सहाव्या बंधाऱ्याच्या बांधकामास सुरुवात



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पा.गायकवाड**

दि.१५ / १२ / २०२५ वार शनिवार रोजी गुरुजी फाउंडेशन कुसुमनगर वागलवाडा ता.उमरी जि.नांदेड या संस्थेचे मुख्य प्रेरणास्त्रोत तसेच व्हीपीके ग्रुपचे संस्थापक चेअरमन माननीय श्री मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांच्या हस्ते बंधारा भूमिपूजन करण्यात आले यावेळी तळेगाव गावचे सरपंच सुरेशराव देशमुख, माधवराव पाटील जाधव, ग्रा. प उपसरपंच, मोगलजी,माधव चिलमवाड,चिंचाळा गावचे माजी सरपंच अशोक पाटील कदम,हर्षवर्धन देशमुख जिल्हाध्यक्ष शोर्य प्रतिष्ठान नांदेड सह गावातील प्रतिष्टीत नागरिक उपस्थित होते.

गुरुजी फाउंडेशनच्या माध्यमातून उमरी तालुक्यात पाच ते दहा बंधारे बांधकाम करण्याचे उद्दिष्ट माननीय मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी व्यक्त केले बंधाऱ्यामुळे पाण्याची साठवणूक होऊन शेतकऱ्यांच्या बोर विहिरीला पाण्याचे स्त्रोत वाढेल व उन्हाळ्यात गुराढोरांना पाण्यासाठी भटकंती करावी लागणार नाही, बागायती शेतकऱ्यांना बंधाऱ्यामुळे पाणी साठविले जाईल त्याचा वापर ऊस हरभरा इत्यादी पिकांना मिळेल या मागचा उद्देश असून परिसरातील पाणी स्त्रोत वाढल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीसाठी उपयुक्त ठरेल, सदरील कामास तळेगाव व चिंचाळा येथील प्रमुख सह कारखान्याचे सिव्हिल इंजिनिअर श्री पवितवार गुत्तेदार सटवा पवार व असंख्य शेतकरी उपस्थित होते.

# लहान वयात पाठीवर दप्तराऐवजी कचऱ्याचे ओझे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**शिराढोन । दौलत पांडागळे**

१ ली ते ८ वि पर्यंत मोफत आणि सक्तीचे शिक्षण असून सुद्धा लहान वयात काही मुले इंचभर पोटाची खळगी भरण्यासाठी गावो गाव पाठीवर पोते घेऊन फिरतात. महाराष्ट्र शासनाने प्रथमीक शिक्षण मोफत आणि सक्तीचे केले आहे या मध्ये १ ली ते ८ वि पर्यंतच्या सर्व मुलांना शाळेत पुस्तक,शालेय पोषण आहार,गणवेश या सुविधा पुरवल्या जातात पण आजही समाजात काही अशी मुले आहेत जी आपल्या कुटुंबाचा आधार कमी वयात बनत आहेत पण त्या वयात त्याना शिक्षणा पासून आई वडील वंचित ठेवतात आणि तीच मुले आज गावोगावी फिरून रिकाम्या बाटल्या जमा करणे ,फायबर च्या वस्तू जमा करून अनवाणी पायाने फिरत असतात.आश्या मुलांना पाठीवर जर दप्तराचे ओझे असते तर उद्याचे भविष्य ते ठरू शकतात.

समाजातील वंचित दुर्बल घटकातील या मुलांना जर शाळेची दारे दाखवून पाठीवर दप्तराच ओझे दिले तर खऱ्या अर्थाने शैक्षणिक क्रांती होऊ शकते.या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सर्वोत्तपरि प्रयत्न करणे गरजेचे आहे.



# संत सेवालाल महाराज जयंती साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सोनपेठ । प्रतिनिधी**

सोनपेठ येथील कै.रमेश वरपुडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ शनिवार रोजी इंग्रजी विभागाच्या वतीने श्री संत सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे प्रा.बंडू राठोड, प्रा.विनायक चौधरी उपस्थित





होते. याप्रसंगी प्रा.बंडू राठोड सरांनी संत सेवालाल महाराजांचे योगदान मराठी आणि गोरमाटी(बंजारा) भाषेत सांगतांना जाणजो, छानजो, पचच मानजो म्हणजे जाणून घ्या, विचार मंथन करा आणि नंतरच ती गोष्ट स्वीकारा असे सांगून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत सातपुते सर यांनी भूषविले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.विठ्ठल खंडूजी जायभाये यांनी, सूत्रसंचालन प्रा.दिलीप कोरडे यांनी तर आभार प्रा.डॉ.गणेश जयतपाल यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व सहकारी बंधू–भगिनी, विद्यार्थी–विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालयात दहावी वर्गातील विद्यार्थ्यांना निरोप समारंभ कार्यक्रम साजरा करण्यात आला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत**

श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय जायकवाडी वसाहत बागपिंपळगाव या शाळेत दि.१५ वार शनिवार दहावी वर्गातील विद्यार्थ्यांना निरोप समारंभ कार्यक्रम साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर,राजमाता जिजाऊ व संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे सरपंच रामेश्वर जगताप हे होते. तर प्रमुख पाहुणे साहारा अनाथलयाचे संतोष गर्जे, केंद्र प्रमुख नामदेव शिंदे, बागपिंपळगाव व बेलगाव सेवा सोसायटी चेअरमन जनार्धन आप्पा चितळकर, डॉ सुभाष ढाकणे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीनिवास देवकते, मधुभाऊ मुगूटराव, माजी सरपंच सखाराम मुगूटराव, शाळेचे मुख्याध्यापक बापुराव घुले, गणेश मुगूटराव आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी साहारा अनाथलयाचे संतोष गर्जे, श्रीनिवास देवकते, डॉ सुभाष ढाकणे, केंद्र प्रमुख तथा केंद्रीय मुख्याध्यापक नामदेव शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, जिवनात ज्ञान हे शाश्वत ज्ञान आहे इतर काहीही नाही. तसेच शेतकरी, सर्वसामान्य घराण्यातील विद्यार्थ्यांनी परिस्थितीवर मात करुन आपल्या आई-वडीलांच्या कष्टाचे चीज करावे. तसेच शालेय जीवनात मोबाईलचा अतिवापर टाळावा आणि परिक्षाला समोरे जाताना विवेकबुद्धीने आणि शांत मनाने परिक्षेस सामोरे जावे. तसेच येणारी परिक्षा ही कॉपी मुक्त परिक्षेला समोरे जावे असा मौलिक सल्ला देऊन भविष्यात जगाच्या पाठीवर कुठेही जा परंतु आपल्या गुरुंना विसरु नका असे सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक बापुराव घुले यांनी केले. प्रास्ताविकपर भाषणात त्यांनी शाळेची प्रगती व दहावी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षेत उत्तीर्ण



होणारा विद्यार्थ्यींचा दरवर्षीचा अलेख सांगताना आमच्या शाळेतील विद्यार्थी जास्तीत जास्त मार्क प्राप्त करून केंद्रातुन प्रथम क्रमांक पटकावत असल्यांचे सांगुण यावेळी आमचे विद्यार्थ्यी हे तालुक्यातुन प्रथम येण्याचा मान मिळवतील अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यानंतर दहावी वर्गातील विद्यार्थ्यींनी शाळेतील आठवणींना उजाळा दिला. तर काही विद्यार्थीना शाळेला निरोप देताना अश्रु अनावर झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप गावचे सरपंच रामेश्वर जगताप केले. अध्यक्षीय भाषणात ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, येथील शिक्षकाकडून जे ज्ञान आत्मसात केले आहे. ते ज्ञान आपल्या भावी जिवनात नक्कीच उपयोगी ठरणार आहे. कारण दहावी नंतरचे जिवन हे व्यवहारी जिवन आहे. आपण शिक्षणातून विविध प्रकारच्या डिग्र्या घेता येतात पण चांगला माणुस ही डिग्री घेण्यासाठी आपल्या हातुन चांगले कार्य घडावे लागते. आयुष्यात काही करावयाचे असेल तर मला नौकरी मिळाली नाही. म्हणुन अपयशी न होता कोणताही उद्योग व्यवसाय करा. व वेसना पासुन आलिप्त राहा. येणाऱ्या परिक्षेत मार्क अपेक्षा पेक्षा कमी पडले म्हणुन नाराज न होता. भविष्यात येणाऱ्या विविध परिक्षेत आपण नक्कीच यश प्राप्त करू असे मनात ठाम निच्छय करा असे त्यांनी मार्गदर्शन पर भाषणात विद्यार्थ्यींना सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकीता सगळे व दिपाली माळी यांनी केले. तर आभार अंजली माने यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक बापुराव घुले, शाळेतील शिक्षक भागवत सोळूंके, श्रीमती अंजली माने, श्रीमती मुक्ताबाई मोटे, मयुर येवलेकर नवनाथ घुगे, हरीभाऊ आघाव, श्रीमती वर्षा कांडेकर, योगेश म्हैसनवाड, प्रसाद कुलकर्णी, शिवाजी पवार, गोरख साकळे, बाबासाहेब कांबळे, ज्ञानेश्वर बास्टे आदींनी परिश्रम घेतले.

## कष्टाच्या संघर्षाला यश !

# हिवरखेड येथील मदन जागृतची मुंबई पोलीस दलात निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिवरखेड । प्रतिनिधी**

कठोर परिश्रम, आत्मविश्वास आणि कुटुंबाच्या पाठिंब्यामुळे हिवरखेड (ता. मेहकर जिल्हा बुलढाणा) येथील मदन जागृत याची मुंबई पोलीस दलात हवालदार पदावर निवड झाली आहे. या यशामुळे मदनच्या कुटुंबासह संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण आहे.

मदनचे बालपण एक सामान्य शेतकरी कुटुंबात गेले. त्याच्या आई-वडिलांनी अनेक अडचणींना सामोरे जात आपल्या दोन्ही मुलांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी मेहनत घेतली.कुटुंबाची परिस्थिती बेताची असताना वडील अल्पशा आजाराने लवकरच सोडून गेल्यामुळे आई ने मुलांना कोणतीही कमतरता भासू दिली नाही. मदन जागृत हे एमआयडीसी मध्ये काम करत खूप अभ्यास केला.मुंबई पोलीस दलात निवड झाल्याने मदनच्या आई-आणि भाऊ यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. गावकरी आणि नातेवाईकांनी त्याच्या यशाचा जल्लोष साजरा केला. .मदन जागृत यांचा प्रवास संघर्षातून यशाकडे जाणाऱ्या प्रत्येक तरुणासाठी प्रेरणादायी ठरेल. कठीण परिस्थितीवर मात करून जिद्द, मेहनत आणि ध्येयावर विश्वास ठेवल्यास कोणतेही स्वप्न पूर्ण होऊ शकते, हे त्याच्या कर्तृत्वाने सिद्ध केले आहे.



# प्रत्येक लेखक कवींनी आपला गाव,आई,वडील,मामाच्या गावाला लेखणीतून अजरामर केले-सय्यद अल्लाउद्दीन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

कथा,कादंबऱ्या,कविता लेखनाची प्रेरणा जिथून मिळते,जिथे लहानाचा मोठा झालेला आपला गाव,आपले खेडे,आई,वडील,कधीतरी जावयास मिळणारा मामाचा गाव,तिथल्या माणसांचे मिळणारे प्रेम,लेखक,कवींना बरच काही देऊन जातात.मातीचा गंध,प्रेमाचा ओलावा,लेखणीला ऊब देणारा ठरतो.त्यामधूनच काहीतरी लेखन करण्याची उर्मी मिळते.म्हणूनच प्रत्येक लेखक,कवींनी आपल्या गावाला,आई-वडिलांना,मामाच्या गावाला लेखणीतून अजरामर केले. असे प्रसिद्ध कवी सय्यद अल्लाउद्दीन म्हणाले.बीड जिल्ह्याच्या आष्टी तालुक्यातील चिंचाळा या जन्मगावी साठाव्या वाढदिवसानिमित्त गावकऱ्यांकडून केलेल्या भव्य सत्कार नंतर ते बोलत



होते.आष्टी तालुक्यातील चिंचाळा ता.आष्टी,जि.बीड चे भूमिपुत्र सुप्रसिद्ध कवी प्रा.सय्यद अल्लाउद्दीन यांच्या साठाव्या वाढदिवसानिमित्त चिरंजीव डॉ.सय्यद हुमायुद्दीन यांच्या डॉ.सय्यद डेंटल क्लिनिकच्या वतीने चिंचाळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सर्व विद्यार्थी,विद्यार्थिनींना टूथ ब्रश,टूथपेस्ट,आणि बिस्किट पुड्याचे मोफत वाटप करण्यात आले.यावेळी मुख्याध्यापिका हेमलता तरटे,सरपंच पंडित कल्याण पोकळे,पोलीस पाटील गणपत पोकळे,जालिंदर पोकळे,महादेव पोकळे,शाळा समिती अध्यक्ष,मा.सरपंच दिगंबरपोकळे,मा.सरपंच अशोक पोकळे,डॉ.सय्यदहूमायुद्दीन,डॉ.सय्यद वलीयुद्दीन,शिक्षक शिक्षिका,दादासाहेब चव्हाण,दीपक म्हस्के,स्वाती खिलारे,वर्षा गळगटे,बेबी शेख,शबनम शेख आदी उपस्थित होते.

# गेवराई शहरात सेवालाल महाराजांचा अर्धाकृती पुतळा उभारणार-आ.विजयसिंह पंडित

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत**

महामानव हे कोणत्याही एका जातीपुरते मर्यादित नसतात तर सर्व समाजातील दुर्बल, दुर्लक्षित घटकांना न्याय देण्याच्या दृष्टिकोनातून त्यांचे विचार असतात. संत सेवालाल महाराज हे फक्त बंजारा समाजापुरते मर्यादित नाही तर सर्व समाजासाठी त्यांचे विचार प्रेरणा देणारे आहेत. यापुढील काळात शिवजन्मोत्सव सोहळ्याप्रमाणेच संत सेवालाल महाराज यांची जयंती उत्सव सोहळा सार्वजनिकरित्या सामाजिक उपक्रम घेऊन दरवर्षी साजरा करण्यात येईल आणि गेवराई शहरांमध्ये संत सेवालाल महाराजांच्या नावाचा चौक निश्चित करून त्या ठिकाणी संत सेवालाल महाराजांचा अर्धाकृती पुतळा उभारला जाईल असे आश्वासन आ. विजयसिंह पंडित यांनी दिले. संत सेवालाल महाराज यांच्या २८७ व्या सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित अभिवादन सोहळ्यात ते बोलत होते.

संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष पृथ्वीराज पंडित यांच्या नेतृत्वाखाली दि.१५ फेब्रुवारी रोजी गेवराई शहरातील शास्त्री चौकात अभिवादन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ.विजयसिंह पंडित यांच्या हस्ते




संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक बाबुराव जाधव, उत्सव समितीचे अध्यक्ष पृथ्वीराज पंडित, शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, जयंती उत्सव समितीचे उपाध्यक्ष रवी पवार, शितलताई साखरे, शेखर भुंबे, कमलेश वाघमारे, कार्याध्यक्ष सोमनाथ गिरगे, सचिव रहीम शेख, सहसचिव अनिल सौदरमल, कोषाध्यक्ष अमोल राठोड, संघटक सतीश प्रधान, मूर्तिकार मनोज राठोड यांच्यासह समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त सायंकाळी पाच वाजता समितीचे अध्यक्ष पृथ्वीराज पंडित यांच्या नेतृत्वाखाली गेवराई शहरातून सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेची भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. शोभायात्रेत मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संत सेवालाल जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाला अनिल राठोड, रामेश्वर पवार, खरेदी विक्री संघाचे उपसभापती गणपत राठोड, रामकिसन राठोड, कैलास पवार, रोहिदास चव्हाण, शंकर पवार, बाबासाहेब चव्हाण, विजय राठोड, जानू पवार बी.जे राठोड, अंबादास राठोड विठ्ठल राठोड, डॉ. विश्वनाथ राठोड, लहू राठोड यांच्यासह बंजारा समाज बांधवासह गेवराई शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिल राठोड यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एल.जी जाधव यांनी केले तर आभार वसंत राठोड यांनी मानले.

# गेवराई तालुक्यातील निराधारांना आधार देणाऱ्या हिमायत फाउंडेशनच्या कार्यालयाचे उद्घाटन संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत**

धर्म, पंथ, जात, पात न पाहता केवळ मानवतेच्या दृष्टिकोनातून गेवराई तालुक्यातील निराधारांना आधार देणाऱ्या आणि गंभीर आजार असलेल्या गोरगरीब रुग्णांना लाखोंची आर्थिक मदत करून सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्याच्या माध्यमातून अल्पावधीतच नावलौकिक मिळविलेल्या, मुफ्ती उमर कुरेशी यांनी स्थापन केलेल्या हिमायत फाउंडेशन या सेवाभावी संस्थेच्या कार्यालयाचे उद्घाटन गुरुवार, दिनांक १३ फेब्रुवारी २०२५ रोजी जोहरच्या नमाज नंतर दुपारी जामिया बद्रुससफा (भुसावळ) चे संचालक मौलाना अखलाक साहब युसुफ जई यांच्या हस्ते करण्यात आले.






या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जामिया बद्रुससफा (भुसावळ)चे व्यवस्थापक मौलाना मुफ्ती अश्फाक साहब, जामिया तय्यबुल उलूम गेवराईचे मोहतमीम मुफ्ती सय्यद मोईनोद्दीन साहब कास्मी, मक्का मस्जिदचे मुख्य इमाम मुफ्ती अब्दुल हफीज, मौलाना नवीद कुरेशी, हाफेज शेख आलम, युवानेते यशराज भैय्या पंडित, युवानेते शिवराज पवार, पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे युवा प्रदेशाध्यक्ष धम्मपाल कांडेकर, माजी नगरसेवक सय्यद एजाज, ज्येष्ठ पत्रकार काझी अमान, राज्य खाटीक सेवा संस्थेचे जिल्हाध्यक्ष मुस्ताक कुरेशी आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी हिमायत फाउंडेशनच्यावतीने फाउंडेशनच्या उपाध्यक्ष सय्यद सोहेल रियाज, सचिव शेख मुजीब शकील, सहसचिव सय्यद शाकेर रशीद, कोषाध्यक्ष सोहेल अब्दुल मजीद बागवान, सिरहान अब्दुल हाजी उर्फ बाबा चाऊस, सदस्य राज बाबू शेख, शेख समीर शेख हारून, सय्यद अब्दुल माबुद अब्दुल बाखी या पदाधिकाऱ्यांनी सर्व उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले. आपल्या प्रास्ताविक भाषणात संस्थेचे अध्यक्ष मुफ्ती उमर कुरेशी यांनी हिमायत फाउंडेशनच्या आठ महिन्यांच्या कार्याचा आढावा घेतला. तर उद्घाटक मौलाना अखलाक साहब युसुफ जई यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात जनसेवेचे महत्त्व पटवून दिले. मुफ्ती सय्यद मोईनोद्दीन कासमी यांच्या दुआने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मक्का मस्जिदचे इमाम मौलाना शेख ताहेर यांनी केले. या कार्यक्रमास टिपू सुलतान युवा मंचचे जिल्हाध्यक्ष अमजद उर्फ बब्बूभाई, बागवान समाज युवा मंचचे तालुकाध्यक्ष मोहसिन बागवान, युवासेना शहर प्रमुख शेख शहेदाद, मुफ्ती बिलाल, हाफेज सलीम, हाजी सय्यद इमरान, पत्रकार सय्यद मुदसीर, सय्यद मोहसीन कादरी, मोहसीन कुरेशी, अब्दुल खवी यांच्यासह सर्व समाजबांधव आवर्जून उपस्थित होते. या कार्यक्रमानंतर गेवराई शहरातील तय्यबनगर येथील शिक्षक कॉलनीतील उम्मे सलमा मस्जिद मध्ये गुरुवारी रात्री ईशाच्या नमाज नंतर मौलाना अखलाक साहब युसुफ जई यांचे व्याख्यान झाले. या कार्यक्रमास मुस्लिम बांधव बहुसंख्येने उपस्थित होते. हे दोन्ही कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हिमायत फाउंडेशनचे अध्यक्ष तथा उम्मे सलमा मस्जिदचे इमाम मुफ्ती उमर ईशाअती यांच्यासह फाउंडेशनचे सर्व पदाधिकारी व मस्जिद कमिटीच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# भिगवणच्या सरपंचपदी गुराप्पा पवार यांची निवड

## मागील चार वर्षात सामाजिक सलोखा राखला : परागभाऊ जाधव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूरः । बबनराव धायतोंडे**

भिगवण (ता.इंदापूर) गावच्या सरपंचपदी गुराप्पा गंगाराम पवार यांची निवड झाल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी दिपक कोकरे यांनी दिली.गुप्त पद्धतीने घेण्यात आलेल्या निवडणुकीत सरपंच पदासाठी गुराप्पा गंगाराम पवार यांना १२ मते मिळाली तर श्रीमती निर्मला हरिचंद्र पांढरे यांना ५ मते मिळाली.या निवडणुकीसाठी निवडणूक अधिकारी म्हणून मंडल अधिकारी दिपक कोकरे तसेच गावकामगार तलाठी राहुल देवकर आणि ग्रामपंचायत अधिकारी भगीरथ परदेशी यांनी कामकाज पाहिले.

इंदापूर तालुक्याची राजकीय राजधानी समजल्या जाणाऱ्या भिगवण ग्रामपंचायती मध्ये कुंची कोरवी समाजाचा महाराष्ट्रातील पहिला सरपंच होण्याचा मान गुरप्पा पवार यांनी मिळविला आहे. तर भिगवण गावच्या राजकारणातील आजचा महत्वाचा दिवस म्हणून ओळखला जाणार आहे.अगदी सर्वसामान्य नागरिकाला गावच्या सरपंच पदाचा मान मिळाल्यामुळे राजकीयदृष्ट्या हि नवी नांदी मानली जात आहे.

भिगवण गावाची सरपंच पदाची निवडणूक पार पडताच सर्व समाजाला न्याय दिल्याची भूमिका पँनल प्रमुख आणि युवा नेते परागभाऊ रमेशराव जाधव आणि तत्कालीन पंचायत समिती उपसभापती संजय देहाडे तसेच जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते अशोक शिंदे यांनी व्यक्त केली. त्याचप्रमाणे तीन सदस्यांना सरपंच पदाचा तर तीन सदस्यांना उपसरपंच पद देण्याचा शब्द देण्यात आला होता.यात धनगर समाजातील सदस्याला पहिला सरपंच पदाचा मान तर तेली समाजाच्या सदस्याला दुसऱ्या वेळी आणि कुंची कोरवी समाजाच्या सदस्याला आजच्या दिवशी सरपंच पदाचा बहुमान देण्यात आला तर रामोशी,मुस्लीम आणि बौद्ध समाजाच्या सदस्याला उपसरपंच पदाचा बहुमान देवून सामाजिक सलोखा राखण्याचा प्रयत्न सत्तेतील कार्यकारिणीने केला आहे.सर्व जाती जमातीच्या सदस्यांना सत्तेतील पदाचा लाभ देण्याचा दिशादर्शक पायंडा भिगवणकरांनी पाडला असून तो जिल्ह्यात वाखाणण्याजोगा आहे.अशी चर्चा भिगवण मध्ये पाहायला मिळाली.



आजची भिगवण ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाची निवडणूक बिनविरोध होणार हे जवळपास निश्चित असताना सरपंच पदासाठी दुसरा अर्ज दाखल करण्यात आला.त्यामुळे निवडणूक घेण्यात आली.यात सत्तेतील १६ मते विरोधातील एकच मत असतानाही ५ सदस्यांनी आपली मते विरोधात टाकल्याने आश्यर्य व्यक्त केले जात आहे.तर फुटलेली मते पदाचा मेवा चाखून झालेल्या सदस्यांची की पदे मिळाली नाही म्हणून नाराज झालेल्या सदस्यांची याबाबत दबकी चर्चा सुरु झालीय.मात्र मतदान गुप्त असल्यामुळे नावे समजणें शक्य होणार नाही.या निवडीनंतर जयदीप जाधव,अशोक शिंदे तसेच संजय देहाडे यांनी सुभेच्छा दिल्या तर निवनियुक्त सरपंच गुराप्पा (आबजी )पवार यांनी आभार व्यक्त केले.

# माणिक प्रभू उच्च व माध्यमिक विद्यालय आंबुलगा ता. कंधार परीक्षा केंद्रावर कॉपीमुक्त अभियान




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आंबुलगा । सूर्यभान बिजलगावे**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेतली जाणारी बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत होत आहे. माणिक प्रभू उच्च व माध्यमिक विद्यालय आंबुलगा परीक्षा केंद्रावर ४७१ विद्यार्थी परीक्षा देत आहेत. परीक्षा सुरुळीत पार पडण्यासाठी शिक्षण विभागाने आवश्यक ती सर्व तयारी केली आहे. परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना भयमुक्त व तनावमुक्त वातावरण परीक्षा देता याव्यात या करिता कॉपीमुक्त अभियान राबविण्यात येत आहे. त्यामुळे या वर्षीच्या परीक्षेला महत्व देखील प्राप्त झाले आहे. कंधार तालुक्यातील भरारी पथके सुद्धा नेमली आहेत. व परीक्षा केंद्रावर भेटी देत आहेत. पोलिस प्रशासन सुद्धा चांगल्या प्रकारे बंदोबस्त करीत असल्याचे दिसून येत आहे.

# मुखेड तालुक्यातील अंतर्गत येणारे कर्मचाऱ्यांना क्यूआर कोडची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मुखेड तहसीलदार यांच्याकडे मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क **मुखेड । संदिप वडजे**

मुखेड तालुक्यातील विविध खात्यातील अधिकारी कर्मचारी तलाठी. मंडळ अधिकारी ग्रामसेवक. तर काही तालुक्यातील व तहशील व पंचायत समिती मधील आपले जबाबदार कर्मचारी मुख्यालय रहात नाहीत तरी आपल्या सर्व कर्मचारी हाजरी क्यू आर कोड ची अंमलबजावणी करावेत हे जबाबदार कर्मचारी मुख्यालय राहत नाहीत ही माहिती निदशणास आणून देऊन यांच्यावर आपण कुठलीच कार्यवाही केली नाही तरी आपण त्यांच्यावर दंड दंडात्मक कारवाही करून सज्झाच्या व निवासी राहण्याचे आदेश द्यावेत व ते निवासी ठिकाणी रहात काय त्यांची पाहणी करावी हेडकार्डर ला मुक्कामी राहाता आशे खोटे घर भाडे पावती जोडून शासनाची व जनतेची फसवणूक करत आहेत हे कर्मचारी आपल्या मर्जीनुसार कार्यालयात येणे व जाणे आपल्या सोयीनुसार करत आहेत व काही कर्मचारी आठवड्यातून किंवा महिन्यातून एक दिवस ग्रामीण भागात जातात अशी मागणी महाराष्ट्र पोलीस बॉईज असोसिएशन जिल्हा उपाध्यक्ष नांदेड व्यंकट जाधव यांनी निवेदनाद्वारे तहसीलदार मुखेड यांच्याकडे केली आहे.



नरसी सेवा सहकारी सोसायटी निवडणुकीसाठी आज उमेदवारी अर्ज दाखल करताना पॅनल प्रमुख मा. श्री संभाजी पाटील भिलवंडे, माणिकराव लोहगावे, मोहन पाटील भिलवंडे, भास्कर पाटील भिलवंडे, रवींद्र पाटील भिलवंडे, गोपाळराव कुलकर्णी साहेब, मधुकर पाटील ताटे, अशोक पाटील साखरे, बालाजी तुपेकर सर, हनुमंतराव कोकणे, माधव वडजे, विरभद्र कोरे, बापूराव कोरे, शंकरराव बोधने सर, गोविंदराव तुपेकर, सुभाष पेरकेवार, बालाजी पाटील भिलवंडे, विशाल पाटील भिलवंडे, चंद्रशेखर पाटील भिलवंडे, गणेश पाटील भिलवंडे, शिरीष कुलकर्णी, अनिल बोधने, पांडुरंग बागडे, भास्कर कोकणे, रऊफ भई शेख, चंद्रशेखर पाटील भिलवंडे, सुभाष चुटेवाड, मारुती मांजरमे संभाजी भिसे, श्याम कोकणे, परमेश्वर लोहगावे, चंद्रकांत फुलारी, सुनील भेदे (लोकनेता न्युज नेटवर्क नरसी)

# दहावी,बारावीच्या परीक्षेत गैरप्रकार कराल तर होईल गुन्हा दाखल

## विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि नागरिकांना इशारा; जिल्ह्यात कॉपीमुक्त अभियानाची कडक अंमलबजावणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बुलढाणा । ज्ञानेश्वर बुधवत**

राज्यात इयत्ता बारावीच्या परीक्षेला ११ फेब्रुवारीपासून सुरुवात झाली असून, जिल्ह्यात परीक्षा प्रक्रियेत शिस्त आणि पारदर्शकता राखण्यासाठी प्रशासनाकडून कडक उपाययोजना केल्या जात आहेत. परीक्षा केंद्र परिसरात गैरप्रकार रोखण्यासाठी कॉपीमुक्त अभियानाची प्रभावी अंमलबजावणी केली जात असून, गैरप्रकार करताना आढळणाऱ्या विद्यार्थी, पालक, शिक्षण, कर्मचाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला जाईल, याशिवाय मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार सामूहिक कॉपी आढळलेल्या परीक्षा केंद्राची मान्यता रद्द करण्याचा इशारा जिल्हा परिषद शिक्षण विभाग आणि जिल्हा प्रशासनाने दिला आहे.

परीक्षांमध्ये गैरप्रकारांना रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत 'कॉपीमुक्त अभियान' राबविले जात आहे. दहावी, बारावीची परीक्षा सुरळीतपणे पार पडाव्या यासाठी पालकांना व विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात येत आहे. तसेच परीक्षेत गैरप्रकार करताना आढळल्यास गुन्हा दाखल करण्यात येत आहे. अशा प्रकारांना प्रोत्साहन व मदत करणाऱ्यावरही थेट कारवाई करण्याचा निर्देश राज्य शिक्षण मंडळाने दिले आहे.

**परीक्षांवर प्रशासनाचा वॉच**

बुलढाण्यात बारावी परीक्षा ११ ते १८ मार्च दरम्यान होणार असून, ३४,५३५ विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जात आहे. तर दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्चदरम्यान होणार असून, ४०,९१४ विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत. जिल्ह्यात बारावीचे ११६ व दहावीचे १५९ परीक्षा केंद्र असून या केंद्रांवर ही परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी जिल्हास्तरावर एकूण सहा भरारी पथके तसेच प्रत्येक तालुक्यातील तहसीलदार यांचे एकूण १३ भरारी पथके तसेच



पाच उपविभागीय अधिकारी यांची भरारी पथके असे एकूण २४ भरारी पथक कार्यरत असून बारावीच्या ११६ केंद्रावर ११६ बैठे पथक तसेच दहावीच्या १५९ केंद्रावर १५९ बैठे पथक नियुक्त करण्यात आलेले आहेत. या परीक्षांवर कडक लक्ष देण्यासाठी सीसीटीव्हीद्वारे निगराणी ठेवली जात आहे. परीक्षा कक्षामध्ये मोबाइल फोन आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांवर बंदी घातली आहे. परीक्षा केंद्रात विद्यार्थ्यांना शांततेत परीक्षा देता यावी यासाठी हे कॅापामुक्त अभियान राबवले जात आहे. या अभियानांतर्गत केंद्रावर कॅापी पुरविणाऱ्या पालक, अधिकारी, कर्मचारी आणि शिक्षकांवर कारवाई केली जाणार आहे. मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार बुलढाण्याच्या कॅापीमुक्त अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात आहे, अशी माहिती शिक्षणाधिकारी (मा) यांनी दिली आहे.

**संशयित विद्यार्थ्यांची होणार तपासणी**

परीक्षेदरम्यान संशयित विद्यार्थ्यांची तपासणी केली जाणार आहे. परीक्षेत कॉपी अथवा अन्य कुठलाही गैरप्रकार आढळल्यास गुन्हा दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. परीक्षेच्या पारदर्शकतेस बाधा आणणाऱ्या विद्यार्थी, पालक किंवा अन्य व्यक्तींवर कठोर कारवाई केली जाणार आहे.

**आत्मविश्वासाने परीक्षा द्या**

विद्यार्थ्यांनी परीक्षेची योग्य तयारी करून आत्मविश्वासाने परीक्षा द्यावी. गैरप्रकार न करता प्रामाणिकपणे यश मिळवावे. पालक आणि शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना कॅापी न करता परीक्षा देण्यास प्रवृत्त करावे. विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी परीक्षेतील गैरप्रकार रोखणे ही सर्व नागरिकांची जबाबदारी आहे. या कॉपी मुक्त अभियानात पालकांनी विद्यार्थ्यांना योग्य रित्या परीक्षा देण्यासाठी प्रोत्साहित करुन सहकार्य करावे, असे आवाहन देखील जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# सज्जा बोळसा येथील कामचुकार ग्राम महसूल अधिकारी यांना निलंबित करा–किशनदादा गायकवाड कुदळेकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । किशनराव गायकवाड**

ता उमरी: सज्जा बोळसा ग प येथील कामचुकार ग्राम महसूल अधिकारी बि जी पाटील हे सज्जा मुख्यालयी राहत नाहीत. परंतु दर महिन्याला शासनाकडुन पगार उचलायला मात्र चुकत नाहीत. अशा कामचुकार ग्राम महसूल अधिकारी बि जी पाटील यांना त्वरित निलंबित करावे. म्हणून भारतीय जनता पक्षाचे प्रदेश कार्यकारिणी निमंत्रीत सदस्य तथा पत्रकार दैनिक लोकनेता ग्रामीण तालुका प्रतिनिधी उमरी यांनी एका निवेदनाद्वारे तहसीलदार उमरी यांना लेखी निवेदन सादर केलेले आहे.

सविस्तर माहिती अशी की सज्जा बोळसा ग प येथील ग्राम महसूल अधिकारी बि जी पाटील यांना तहसीलदार उमरी यांनी माहे नोव्हेंबर – डिसेंबर २४ मध्ये कुदळा येथील श्रीमंत व धनदांडग्या बोगस राशन कार्ड धारकांची व श्रावण बाळ व इंदिरा गांधी निवृत्ती वेतन योजनेतील श्रीमंत व धनदांडग्या लाभधारकांची चौकशी करून सदर कार्यालयात आव्हाल सादर करावे म्हणून तहसीलदार उमरी यांनी त्यांच्या नांवे नोटीस दिली होती परंतु सदर कामचुकार व मग्रूर ग्राम महसूल अधिकारी बि जी पाटील यांनी चौकशी आज करतो उद्या करतो असे आश्वासन देऊन बोगस लाभार्थी सोबत हातमिळवणी करून सदरील बोगस लाभार्थ्यांची चौकशी न करता त्यांची पाठराखण केलेला आहे. याबाबत निवेदन कर्ते किशनदादा गायकवाड यांनी डिसेंबर २४ पासून त्यांची भेट घेण्यासाठी सज्जा ठिकाणी व तहसील कार्यालय उमरी येथे शेकडो वेळा चक्करा मारीत आहेत परंतु गायकवाड यांना ग्राम महसूल अधिकारी बि जी पाटील अद्याप भेटलेला नाही. तर सर्व सामान्य नागरिक व शेतकरी, विध्यार्थी व महीलाचे काय हाल होत असतील. म्हणून गायकवाड यांनी त्यांच्या विरोधात तहसीलदार साहेब उमरी यांना लेखी निवेदन दिले असून मुख्यालयी राहुन कर्तव्य पार न पाडणा–या कामचुकार, मग्रूर व भ्रष्ट ग्राम महसूल अधिकारी बि जी पाटील यांना त्वरित पदावरून निलंबित करावे.अन्यथा सदर ग्राम महसूल अधिकारी आपल्या पत्राला पायदळी तुडवून कामाला दांडी मारीत असेल तर जिल्हाधिकारी नांदेड यांचेकडे निलंबनाबाबत लेखी कळवुन कामचुकार व मग्रूर ग्राम महसूल अधिकारी बि जी पाटील यांना त्वरित निलंबित करावे. अन्यथा यांच्या पाठीशी अपला हात आहे. असे गृहीत धरून आपल्या कार्यालया समोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

# भोकर आगार अस्वच्छता व असुविधांचे माहेर घर







■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**

स्वच्छतेच्या संदर्भात संभाजी नगर प्रदेश क्रमांक १ येथून क दर्जा प्राप्त भोकर आगारात सद्यस्थितीत सर्वत्र घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून प्रवासी वर्गात संतापाची लाट उसळली आहे. भोकर आगाराला तत्कालीन आगार प्रमुख दिवटे हे असतांना स्वच्छतेच्या बाबतीत काळजी घेण्यात आली. वेळेवर प्रवाशांना नियमीत सेवा देणे, तक्रारिंचे वेळेवर निपटारा करणे या निकषावर्ती भोकर आगाराला १५ ऑगस्ट २०२४ रोजी, नांदेड विभागातून,भोकर आगारास एक लाख रुपयांचे रोख पारितोषिक देऊन शासनाने गौरविले होते पण सद्यस्थिती पहाता खरेच या आगाराला पारितोषिक मिळाले आसेल का? आसा प्रतिप्रश्न प्रवाशांना पडत आहे. वाहतुक नियंत्रक आणि प्रवासी चौकशी खिडकीच्या समोरच धुम्रपान करुन भिंत रंगवण्यात आल्या आहेत त्या बरोबरच प्रवाशी निवाऱ्यात प्रत्येक ठिकाणी देखील स्वच्छता असल्याने घान पसरलेली दिसून येत आहे. प्रवाशांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध नाही.

भोकर आगारातुन लांब पल्याच्या जाणाऱ्या अनेक बसला अधिकचे टायर (स्टेफ्नी) नसल्यामुळे आनेक वेळा टायर पंम्चर झाल्याने प्रवाशांना तासनतास दुसरी बस मिळेपर्यंत ताटकळत थांबण्याची वेळ ओढावत आहे. प्रथम उपचार पेट्या ह्या मेडीसिन अभावी रिकाम्याच पडल्याने त्या आता चालकाचा तोटा,चुना ठेवण्याच्या कामी येतांना दिसत आहेत.

महामंडळने भरमसाठ तिकीट दरवाड केली मात्र त्या प्रमाणांत प्रवाशांना सुविधा मिळत नसल्याने संताप व्यक्त होत आहे.

> **माझे आजपर्यंत हिरकणी कक्षाकडे लक्ष नव्हते पण इथून पुढे सर्व बाबीकडे लक्ष देऊन आगारातील ज्या काही समस्या आहेत त्या दुरुस्त करून घेण्याचा प्रयत्न करेल. त्याबरोबरच आगारात धूम्रपान करणाऱ्या कर्मचाऱ्यावरती लक्ष ठेवून सक्त कारवाई करेन व प्रवाशांना चांगल्यात चांगल्या सुविधा कशा मिळतील यासाठी सुद्धा प्रयत्नशील राहील.**
>
> **–एस.एन.पुंडगे ,आगार प्रमुख भोकर**

**हिरकणी कक्ष नावालाच**

विभागात क दर्जा प्राप्त आगारातील हिरकणी कक्ष हे नावालाच उरले असुन या मध्ये कचरा साफ करण्याचे झाडु,बसचे निकामी पार्ट टाकण्यात आले असुन साफ सफाई नसल्याने धुळीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. या मध्ये पिण्याच्या पाणी व आवश्यक सुविधा नाहीत.या कक्षात आगाराचे कर्मचारी कामे करत बसत आसल्याने बाळाचे महिलांना नाईलाजास्तव उघड्यावरच स्तनपान करावे लागत आहे. सोबतच महिला कर्मचाऱ्यांना विश्रमालय उपलब्ध नाही.एव्हढेच नाही तर आगार प्रमुख यांची केबिन देखील कोंडवाडा वाटते या गंभीर बाबी कडे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातील वरिष्ठांनी लक्ष देणे गरजेचे बनले आहे..

**स्थानीक कर्मचाऱ्यांचा तोरा वाढला**

भोकर आगारात स्थानिक कर्मचाऱ्यांची बऱ्यापैकी संख्या असून यातील काही कर्मचारी संबंधित अधिकाऱ्यांवर दबाव आणून आपले मूळ काम सोडून टेबल हस्तगत केले आहेत.

या तुन ते बाहेर तालुक्यातील कर्मचाऱ्यांवर दादागिरी सारखा प्रकार करून त्यांच्या हक्क अधिकारावर गदा आणत आहेत अर्थात रोटेशन पद्धत न अवलंबवीता एकाच चालक कर्मचाऱ्यास लांब पल्याच्या गाड्या देणे,महिला कर्मचाऱ्यांना अधिकचे कामे लावणे, आपले कामे दुसऱ्याकडून करून घेणे, अशा उपद्र्यापी बाबी येथे उदयास आल्या आहेत. आगारातील काही व्याजदार कर्मचारी आपला तोरा मिरवताना आगार प्रमुखांनाच वेड्यात काढतात. सहेबां पेक्षा त्यांचाच तोरा अधिक असतो असा रोष व्यक्त होताना दिसत आहे.

# गंजगांव रेती घाटावर देगलूर उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत गोसावी कारवाई

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कुंडलवाडी । गंगाधर दुसलवाड**

बिलोली तालुक्यातील गंजगाव रेती घाटावर देगलूर उपविभागीय पोलिस अधिकारी संकेत गोसावी यांनी मंगळवारी १७ रोजी २३ गाड्यावर पोलीस कारवाई केली होती सदरील गाडीची कुंडलवाडी येथे वजन काट्यावर प्रादेशिक परिवहन विभागाच्या नियंत्रणाखाली मोजणी करून त्यातील १७ गाड्यावर मोटर वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात आल्याची माहिती मोटार वाहन निरीक्षक आभीजीत कोळी यांनी दिली आहे बिलोली तालुक्यातील गंजगाव येथील रेती घाटावर गेल्या अनेक दिवसापासून नियमबाह्य मार्गाने रेती उत्खनन मोठ्या प्रमाणात सुरू होते पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांच्या ऑपरेशन. अकाउंटच्या अनुषंगाने अवैध रेती माफियाच्या विरोध जिल्ह्यात एक पथक नेमण्यात आले होते सदरील पथकातील देगलूरचे विभागीय पोलीस अधिकारी संकेत गोसावी यांनी दिनांक११रोजी २३ओहरलोड ताब्यात घेऊन पोलीस कारवाई केली होती या अनुषंगाने बिलोली पोलीस प्रादेशिक परिवहन विभागाच्या सदर ओव्हरलोड गाड्यांची मोजणी करण्यासाठी पत्र व्यवहार केला होता त्यानुसार दिनांक १३ रोजी कुंडलवाडी येथील वजन काट्यावर रेतीने भरलेल्या १७ गाड्याची मोजणी प्रादेशिक परिवहन विभागाच्या नियंत्रणाखाली करण्यात आली आहे मोजणी केल्या सर्व १७ गाड्याची मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई केल्याची माहिती मोटार वाहन निरीक्षक आभीजीत कोळी यांनी दिली आहे यावेळी मोटर वाहन सहाय्यक निरीक्षक विशाल बटुले संगपाल कदम आधी उपस्थित होते.

# हर्षवर्धन पाटील यांनी केला महसूल सहाय्यक पदी निवड झालेल्या उमेदवारांचा सन्मान!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**



राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) वतीने सन २०२३ मध्ये झालेल्या स्पर्धा परीक्षेतून महाराष्ट्र शासनामध्ये महसूल सहाय्यकपदी निवड झालेल्या मैथिली अंबादास शिंगाडे (शेळगाव),ऋतुज राजेंद्र कवडे-देशमुख (बावडा),पूजा मोहन गलांडे (गलांडवाडी नं.१),विक्रम सोपानराव व्होरकाटे (तावशी) यांचा इंदापूर येथील भाग्यश्री बंगलो येथे शनिवारी (दि.१५) सत्कार करण्यात आला.

प्रशासनामध्ये काम करत असताना चुकीचे असे वागू नका,त्यामुळे त्रास होतो. प्रशासनामध्ये लोकाभिमुख पद्धतीने काम करा,असे प्रतिपादन यावेळी हर्षवर्धन पाटील यांनी केले.तसेच याप्रसंगी साखर कारखान्यांच्या कार्यकारी संचालक(एम.डी.) पॅनल मध्ये निवड झालेबद्दल विजय दत्तात्रय शिर्के (वडापुरी) यांचाही हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी नीरा भीमा कारखान्याचे चेअरमन लालासाहेब पवार,इंदापूर पंचायत समितीचे माजी सभापती विलासराव वाघमोडे,उदयसिंह पाटील, दत्तात्रय शिर्के,मनोज पाटील,सुखदेव घोलप,विकास पाटील,अंबादास शिंगाडे, लालासाहेब सपकळ,राजेंद्र गायकवाड, यशवंत वाघ,बाळासाहेब गायकवाड, अरविंद जगताप,रंगनाथ देवकाते,अँड. पांडुरंग गायकवाड,महेश शिर्के ,शाम परकाळे ,सुरज व्होरकाटे,राहुल व्होरकाटे, नामदेव सपकळ,दत्तात्रय मळके आदी मान्यवर उपस्थित होते.

# उमरी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी राष्ट्रवादी युवक सदस्य नोंदणी

## गाव तिथे शाखा संदर्भात बैठक संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**

उमरी /राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जनसंपर्क कार्यालय उमरी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विक्रमजी देशमुख तळेगावकर, नांदेड जिल्हा दक्षिण जिल्हाध्यक्ष संभाजी पाटील मुकणार, यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रथम संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांना पुष्पहार अर्पण अभिवादन करून पुढील कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस सदस्य नोंदणी व युवक अभियान राष्ट्रवादीं गाव तिथे शाखा, या प्रमुख विषयावर मोलाच मार्मिक असं मार्गदर्शन नांदेड दक्षिणचे जिल्हाध्यक्ष मुकणार साहेब युवकांना उद्देशून व तालुक्यातील जमलेल्या युवकांना मार्गदर्शन पर भाषण केले, तसेच त्या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून संतोष पाटील थडगे, व जिल्हा उपाध्यक्ष नांदेड, तसेच त्या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून संतोष पा थडगे नांदेड, मिलिंद कावळगावकर विधानसभा अध्यक्ष देगलूर बिलोली ,व अशोक कांबळे देगलूर शहर अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी देगलूर ,या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत मुकणार



साहेब म्हणाले राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी म्हणजे फुले शाहू आंबेडकर यांच्या विचारधारेवर काम करणारा पक्ष आहे, आपल्या पक्षात जात धर्म पंथ वर्णभेद नसून तो पक्षात राहून दिवस रात्र काम करतो त्याला पक्ष मोठे केल्याशिवाय राहत नाही ,अशा मार्मिक शब्दांमध्ये युवकांना उद्देशून मुकनर साहेब म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मजबूत करायचा असेल तर तळागाळात गेलं पाहिजे, जनतेपर्यंत पोहोचले पाहिजे ,जनतेशी हितगुज केले पाहिजे, तर पक्ष मजबूत होतो, हे त्यांनी दाखवून दिले आहे, त्याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात पक्षप्रवेश झाला त्याप्रसंगी मोहन सिंग आय सिंग बावरी, दयासिंग बावरी ,ह्या दोन युवकांनी गुरुगोविंद सिंग नगर हनुमान गल्ली येथील युवक युवकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला, तसेच या कार्यक्रमाला तालुक्यातील तमाम राष्ट्रवादी आजितपर्व हितगुंजातील पक्ष प्रवेश युवक उपस्थित होते. राष्ट्रवादी दिव्यांग सेल जिल्हा अध्यक्ष हावगीरराव पाटील बेलदारकर,तसेच दिव्यांग उमरी तालुका अध्यक्ष सुरेश चांदू वाघमारे ईज्ञतगाव आबादी, पत्रकार ,तसेच पत्रकार संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष उद्धवराव जी मामडे साहेब,बालाजी पाटील पवार, अविनाश पाटील पडोळे, कैलास पाटील ढगे जिल्हा उपाध्यक्ष इज्ञतगावकर, शेख नवाज मा सरपंच तळेगाव ,संतोष पांचाळ, रावसाहेब पाटील वडजे, महेश पडोळे ,संतोष वाघमारे भायेगावकर, योगेश धुमाळे युवक शहर अध्यक्ष ,मारुती सरपंच, नरसिंग यंगुलवार, रामराव कपावर, माजी सरपंच तळेगाव, रावसाहेब जाधव, माधव गायकवाड, साहेबराव नरवाडे, रब्बानी पटेल यांच्यासह तालुक्यातील बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश हैबते तळेगावकर सामाजिक न्याय विभाग जिल्हा उपाध्यक्ष यांनी सूत्रसंचालन करून आभार मानुन कार्यक्रमाचे सांगता करण्यात आली.


# सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती लोणी सय्यदमिर यांच्या वतीने शिवजयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

संपुर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध असणाऱ्या सार्वजानिक शिवजयंती उत्सव समिती लोणी सय्यदमिर वर्ष ११ वे यांच्यावतीने शिवजयंतीनिमित्त सप्ताहभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून शिवाजी महाराजांच्या इतिहासाचा जागर करणाऱ्या अनेक सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत.त्यामुळे पंचक्रोशीतील अनेक शिवप्रेमी नागरिक उपस्थीत राहणार आहेत.

शिवज्योत यात्रा अन मिरवणूक दिनांक १८ रोजी गावातील सर्व उत्साही तरुण शिवप्रेमी नागरिक व तरुण वर्ग किल्ले शिवनेरी या ठिकाणी शिवज्योत आणण्यासाठी जातात.व दिनांक १९ रोजी मुख्य जयंती सोहळा असतो.शिवज्योत आणण्यासाठी गेलेले सर्व शिवप्रेमी तरुण व उत्साही कार्यकर्ते दिनांक १९ रोजी मुख्य गावाच्या प्रवेशद्वारासमोर हजर होतात.व त्या ठिकाणी गावातील सर्व माता-भगिनी व सर्व गावकरी शिवज्योत आणण्यासाठी गेलेल्या सर्व शिवप्रेमी तरुणांचे उत्साहात स्वागत करतात.त्यानंतर संपूर्ण गावात शिवज्योत मिरवणूक काढली जाते विविध सांस्कृतिक कार्यक्रम लेझिमच्या आवाजात पोवाडा लावून हा कार्यक्रम साजरा केला जातो.



शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम

दिनांक १९/२/२०२५ रोजी मुलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व त्यांच्या उपजत कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी जयंती समितीने शालेय विद्यार्थ्यांच्या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

दि.२०/२/२०२५ रोजी रात्री ठीक ८.३० ते ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासावरील व जीवनावरील मराठी चित्रपटाचे आयोजन करण्यात आले आहे.

दि.२१/२/२०२४ रोजी रात्री ठीक ९ ते ११ यावेळेत ह.भ.प. श्री अक्रूर महाराज साखरे यांचे जाहीर कीर्तन होणार आहे.

दि.२२/२/२०२५ रोजी ठीक ९ ते ११ या वेळेत ह.भ.प.श्री.अक्षय महाराज उगले यांची कीर्तन सेवा आयोजित केली आहे.

दि.२३/२/२०२४ रोजी ठीक ९ ते ११ या वेळेमध्ये ह.भ.प श्री. देवळेकर महाराज यांचे कीर्तन सेवा आयोजित केली आहे.

दि.२४/२/२०२५ रोजी ९ ते ११ या वेळेमध्ये श्री.संतोष महाराज पुजारी यांच्या सांस्कृतिक अशा भारुडाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

दि.२५/२/२०२४ रोजी ९ ते ११ या वेळेमध्ये ह.भ.प श्री.सानप महाराज यांचे जाहीर किर्तन होणार आहे.व त्यानंतर महाप्रसादाचा भव्य असा कार्यक्रम होणार आहे महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी संपूर्ण जिल्हा परिषद गटातील व महाराष्ट्रातील शिवप्रेमी नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आमंत्रण आयोजक व संयोजकांनी दिले आहे.छत्रपती शिवाजी महाराज हे आपणा सर्वांचे अस्मितेचे आणि अभिमानाचे प्रतीक आहे.हा जयंती उत्सव शांततेत पार पडण्यासाठी व उत्साहात साजरा करण्याचे नियोजन आहे या उत्सवासाठी कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही याची काळजी शिवजयंती उत्सव समिती घेणार आहे.तरी सर्व शिवप्रेमी नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन शिवप्रेमी समितीतर्फे करण्यात आले आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904